वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. १३ मे २०२५ पाने ४ किंमत ३

# शरद पवारांचा अजितदादांना कानमंत्र !

## सहकारच्या मेळाव्यात राष्ट्रवादीच्या एकीकरणाची चर्चा



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

मुंबई, (दिव्य न्युज):- गेल्या काही दिवसांपासून शरद पवार आणि अजित पवार यांचा गट एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे. अशातच आज (१२ मे) पुन्हा एकदा सहकार परिषदेच्या कार्यक्रमात शरद पवार आणि अजित पवार एकत्र आल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. महत्वाचे म्हणजे मंचावर असतानाच शरद पवार यांनी अजित पवारांच्या कानात गुफ्तगू केल्याने राष्ट्रवादी एकीकरणाच्या चर्चा आणखी बळावली आहे. अजित पवारांनी वेगळी राजकीय चूल मांडल्यानंतर कौटुंबिक कार्यक्रम वगळता शरद पवार यांनी अजित पवारांशी सार्वजनिकरित्या चर्चा करणे टाळले आहे. पण आज खुद्द पवारांनी अजित पवारांशी कानात केलेले गुफ्तगू सर्वांच्या चर्चेचा विषय बनला आहे. विशेष म्हणजे दोनच दिवसांपूर्वी सुप्रिया सुळे आणि अजित पवार एकाच मंचावर आले होते. त्यावेळी दोघांचे हसतमुख फोटो बाहेर आले होते. त्यानंतर आज काका-पुतणे एकाच मंचावर आल्याने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल आहे.

वायबी चव्हाण सेंटर या ठिकाणी राज्य सहकारी बँकेचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाला शरद पवार यांच्यासह नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे उपस्थित होते. कार्यक्रम संपण्याआधी गडकरी आणि एकनाथ शिंदे निघून गेले. तसेच कार्यक्रम संपल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निघून गेल्यानंतर पवारांनी अजित पवारांना बोलवून कानात काही संदेश दिला. त्यामुळे उपस्थितांचे लक्ष या दृश्याकडे वळले गेले.

**विशेष अधिवेशनात संरक्षण क्षेत्राबद्दल किती चर्चा करणार- पवार**

भारत पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षाकडून विशेष अधिवेशनाची मागणी होते आहे. पण विशेष अधिवेशन बोलावण्यापेक्षा सर्व पक्षांच्या नेत्यांना एकत्र आणून चर्चा करणे अधिक योग्य ठरेल. यामुळे काश्मीर प्रश्नावर पारदर्शकता येईल, तसेच सर्व पक्षांना सरकारच्या भूमिकेची माहिती मिळेल. कारण काश्मीर प्रश्न हा फक्त भारत-पाकिस्तान संबंधांचाच भाग नाही, तर तो राष्ट्रीय एकतेचा आणि सुरक्षेचा मुद्दा आहे. या विषयावर सर्व पक्षांना विश्वासात घेऊन राष्ट्रीय एकमत निर्माण केले जावे. यामुळे काश्मीर प्रश्नावर भारताची भूमिका अधिक मजबूत होईल. तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा दृष्टिकोन स्पष्ट होईल, असे वक्तव्य शरद पवार यांनी केले आहे.

# विभागात बीड जिल्हा अव्वल

## बारावीनंतरही दहावीत मुलींनीच मारली बाजी

बीड, (दिव्य न्युज):- विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा टर्निंग पॉईंट ठरणाऱ्या दहावी बोर्ड परिक्षेचा निकाल आज (१३ मे) रोजी जाहिर झाला. विभागात बारावीपाठोपाठ दहावी बोर्ड परिक्षेतही बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी अव्वल बाजी मारली आहे. तर छत्रपती संभाजीनगर दुसऱ्या स्थानी राहिले आहे. विभागात मुलांपेक्षा आपणच हुशार असल्याचे मुलींनी दाखवून दिले आहे. यंदा मात्र गतवर्षीच्या तुलनेत या निकालाची घोषणा विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे आणि सचीव डॉ.वैशाली जामदार यांनी पत्रकार परिषदेत मंगळवारी दुपारी केली.

विभागाच्या सचीव जामदार यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर विभागात दहावी बोर्ड परिक्षेसाठी १लाख ८५ हजार ४०७ विद्यार्थ्यांनी परिक्षा फॉर्म भरले होते. यापैकी १लाख ८३ हजार ९५७ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. एकूण विद्यार्थ्यांपैकी १लाख७०हजार ७५०विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी ९२.८२टक्के आहे. गतवर्षी

▶▶ पान २ वर

दहावीमध्ये उत्कृष्ट गुण मिळविलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे दिव्य वार्ता परिवारा तर्फे
हार्दिक अभिनंदन



# लग्नाची हळद उतरण्या अगोदरच बीडची नवरी प्रियकरासोबत पळाली भुर्रर्र

बीड, (दिव्य न्युज):- प्रेमासाठी काही लोक वाटेल ते करतात. अशीच एक अजब घटना आता समोर आली आहे. अंगावरची हळद उतरण्याआधीच नवरी प्रियकरासोबत पळून गेल्याची धक्कादायक घटना बीडमध्ये घडली आहे. नातेवाईकांकडून वधूची शोधाशोध सुरू झाली. मात्र, वधू सापडली नाही. अखेर वधूच्या पित्याने या प्रकरणी तक्रार देखील नोंदवली. केज तालुक्यात ही घटना घडली आहे.

९ मे रोजी वडिलांनी लेकीचं धुमधडाक्यात लग्न लावलं, १० मे रोजी नवरीने देवदर्शन देखील केलं,त्यानंतर सासरहून तिची माहेरी पाठवणी करण्यात आली. सगळे आनंदात होते मात्र नवरीच्या मनात काही तरी भलतच सुरू होती. माहेरी आल्यानंतर रात्री शौचाला बाहेर जाण्याच्या बहाण्याने भावजईचा फोन घेतला आणि शेजारच्या गावात राहणाऱ्या प्रियकराला फोन केला, त्यानंतर घरी येऊन झोपली. लग्नाच्या गडबडीमुळे थकलेले सगळे नातेवाईक गाढ झोपलेले असताना हीच संधी साधत नवरीने घरातून धूम ठोकली.मध्यरात्री आईला जाग आल्यानंतर ती खोलीत गेली

▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या पक्षात मोठा गोंधळ

## काही कारणामुळे राष्ट्रवादी पक्षात पुन्हा उभी फूट

मुंबई , (दिव्य न्युज):- गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येतील, अशी चर्चा सुरूये. मात्र आता राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावरून पवार गटात उघड-उघड दोन गट पडल्याचं दिसत आहे. ही संभ्रमावस्था एकदाची संपवून टाकावी असं जाहीर आवाहन कार्यकर्त्यांनी केल आहे. तर, एका प्रवक्तत्यांनी विलीनीकरणासाठी थेट सुप्रिया सुळे यांनाच पत्र लिहिले आहे.

मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादीत मनोमिलनाचे वारे वाहत आहेत. राष्ट्रवादीतील या दोन गटांच्या विलीनीकरणाची बातमी थेट मोठ्या पवारांनीच फोडल्याने त्यांच्या

▶▶ पान २ वर



# गावात मुस्लिम कब्रस्तानावर बुलडोझर

## नेकनूर सरपंच लांडगे यांच्या कृतीने वाद निर्माण होण्याची शक्यता

### दलित-मुस्लिमांच्या पाठिंब्यावर निवडून आलेल्या सरपंचाचे वर्तन चर्चेत-अन्वर हाशमी

नेकनूर, ( दिव्य न्युज):- गावातील मुस्लिम कब्रस्तानावर सरपंच लांडगे यांच्या आदेशानुसार बुलडोझर चालवण्यात आल्याने गावात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून, ग्रामपंचायत हद्दीत अशा प्रकारची कारवाई कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.



विशेष म्हणजे, सरपंच लांडगे हे दलित व मुस्लिम समाजाच्या मतांवर निवडून आले असूनही, त्यांनी भाजपप्रणीत विचारांप्रमाणे कार्यवाही केल्याचा आरोप स्थानिक कार्यकर्ते करत आहेत. ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असून, या पक्षाने केंद्रात भाजपसोबत युती केली आहे. त्यामुळे भाजपचा स्थानिक निर्णयप्रणालीवर प्रभाव जाणवू लागल्याचे नागरिकांचे

▶▶ पान २ वर

# बीड न.प.तील जाधव यांचे काम पारदर्शीच

# चमकोगिरी करणाऱ्यांना सणसणीत चपराक



बीड, (दिव्य न्युज):- येथील नगर पालिकेतील स्वच्छता निरीक्षक तथा भांडारपाल भागवत जाधव यांना एलईडी लाईट खरेदीच्या मुद्यावरून जाणीवपुर्वक द्वेष भावनेतून टार्गेट करण्याचा प्रयत्न काही चमकोगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून होत आहे. वास्तविक पाहता एलईडी

### एलईडी लाईट प्रशासकीय ठरावाप्रमाणेच खरेदी

लाईट खरेदी ही शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच झालेली आहे. एवढेच नव्हे तर नगर पालिकेने २ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव घेतला होता. त्या प्रशासकीय ठरावाप्रमाणेच ही सर्व खरेदी झाल्याचे स्पष्ट होत आहे. विनाकारण ओढून-ताणून एखाद्या विषयात काम करणाऱ्या व्यक्तीला टार्गेट करणे आणि नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी ही सणसणीत चपराक मानली जात आहे.

बीड नगर पालिकेने २ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वसाधारण सभेत नवीन एलईडी पथदिवे नगर पालिका स्तरावर खरेदी करणे आणि शहरातील पथदिवे व न.प.मालकीच्या विद्युत उपकरणाच्या दुरुस्तीकरिता आवश्यक साहित्य पुरवठा करण्याबाबत ठराव घेतला होता. या प्रशासकीय ठरावाच्या आधिन राहूनच भागवत जाधव यांनी ही सर्व खरेदी प्रक्रिया राबवलेली आहे. एलईडी लाईट खरेदी करण्याचा डीएसआर

▶▶ पान २ वर

# नव्या सरन्यायाधीशांच्या आईलाही वाटतं निवडणुका बॅलेट पेपरवरच व्हाव्यात

मुंबई , (दिव्य न्युज):-अमरावतीचे सुपूत्र भूषण गवई हे उद्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदाची शपथ घेणार आहेत. भूषण गवई यांच्या मोतोश्री कमलताई गवई या चांगल्याच भावुक झाल्या आहेत. त्यांना अश्रू अनावर झाले. भूषण गवई यांना लहानपनापासूनच समजसेवेची आवड होती, आज आई म्हणून मला प्रचंड अभिमान वाटत आहे, देशाच्या हिताचे निर्णय भूषण गवई घेतील अशी भावना यावेळी भूषण गवई यांच्या आईने व्यक्त केली आहे.




दरम्यान भूषण गवई हे उद्या सरन्यायाधीश पदाची शपथ घेणार आहेत. त्याकरिता त्यांचं संपूर्ण कुटुंब आज दिल्लीला रवाना होणार आहे. त्यापूर्वी भूषण गवई यांच्या आईने येत्या काळात निवडणुका बॅलेट पेपरवर व्हाव्यात अशी इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे भूषण गवई बॅलेट पेपर संदर्भात प्रलंबित निकालावर काय निर्णय देतात? याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

सरन्यायाधीश पदाच्या खुर्चीवर बसल्यावर भूषण गवई यांना जो योग्य वाटेल तो निर्णय ते घेतील. बाबासाहेबांनी संविधानात लोकांना केंद्रबिंदू ठेवलं आहे. लोकांमधील एक व्यक्ती म्हणून मलाही येत्या काळात निवडणूक बॅलेट पेपरवर व्हाव्यात असं वाटतं. बॅलेट पेपर केव्हाही चांगलं आहे, यापूर्वी देखील बॅलेट पेपरवरच निवडणुका व्हायच्या, असं मत यावेळी गवई यांच्या मातोश्री

▶▶ पान २ वर

# वर्षभरात बीड जिल्ह्यात ९ कोटी ३९ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक

### सायबरमध्ये ९० गुन्हे दाखल

बीड , (दिव्य न्युज):-बीड जिल्ह्यात ऑनलाइन फसवणुकीच्या तक्रारींमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. २०२४ या गतवर्षात सायबर भामट्यांनी ९ कोटी ३९ लाख रुपये हडपले आहेत. त्यातील केवळ ८७ लाख २९ हजार रुपये परत मिळवून देण्यात सायबर पोलिसांना यश आलं आहे. बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेच्या निलंबनापासून सायबर विभाग चर्चेत आहे. अशातच कासलेनंतर मागील आठवड्यात दोन कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे.पोलीस ठाण्यात दाखल २०२४ मध्ये वेगवेगळ्या माध्यमातून फसवणूक झाली असून यामध्ये बोगस वेबसाईट, बोगस कस्टमर

▶▶ पान २ वर

### निवडणुकांची तयारी, भाजपने भाकरी फिरवली

# राज्यात ५८ जिल्हाध्यक्षांची नवी यादी जाहीर

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने पक्ष संघटनेत महत्त्वाचे बदल केले आहेत. राज्यात विधानसभा निवडणुकांनंतर भाजपने वरिष्ठ नेते रविंद्र चव्हाण यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याऐवजी पक्षीय स्तरावर मोठी जबाबदारी दिली. भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात भाजपने संघटन पर्व अभियान राबवले. त्या माध्यमातून भाजपने तब्बल दीड कोटी सदस्य नोंदणी पूर्ण केली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ही

▶▶ पान २ वर

## बसस्थानकात कारवाई, ५१ ग्रॅम वजनाचे दागिने महिलेकडून जप्त

# प्रवाशांचे ५ लाखांचे सोने चोरले बीडची महिला लातुरात अटकेत

बीड, (दिव्य न्युज):- गर्दीचा फायदा घेत बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांचे दागिने चोरणाऱ्या बीड जिल्ह्यातील महिलेला अटक करण्यात लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. महिलेची झडती घेतली असता तिच्याकडे ५ लाख रुपये किमतीचे ५१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आढळले. हे दागिने पोलिसांनी जप्त केले आहेत. वैशाली काळे (३०, रा. माजलगाव, जि. बीड) असे अटक केलेल्या महिलेचे नाव आहे. पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर जिल्ह्यामध्ये होणाऱ्या चोऱ्या आणि सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले, उपनिरीक्षक संजय भोसले, सूर्यकांत कलमे, योगेश गायकवाड, राजेश कंचे, विनोद चलवाड यांचे पथक गुन्ह्यांचा तपास करत होते. शहरातील बसस्थानक क्रमांक २ मध्ये एक महिला संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे पथक बसस्थानकात दाखल झाले. त्या ठिकाणी एक महिला प्रत्येक बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीत सामील होत असल्याचे आढळून आले. महिलेला ताब्यात घेत तिची चौकशी केली असता महिलेने तिचे नाव वैशाली काळे असल्याचे सांगीतले. तिची झडती घेतली असता तिच्याकडे चोरलेले ५१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आढळून आले. तिने प्रवाशांकडून हे दागिने चोरल्याची कबुली दिली. महिलेने अहमदपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन गुन्हे तर शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एक गुन्हा केला आहे.



### ब्लेडचा खुबीने वापर

संशयित वैशाली काळे ही महिला बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांच्या अंगावरील दागिने ब्लेडने कापून घेत होती. त्यामुळे प्रवाशांना चोरीचा सुगावा लागत नव्हता. विशेष करून गर्दीतील महिला आणि मुलांना ती टार्गेट करत होती, अशी माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.

### प्रवासात दागिने टाळा

सध्या लग्नसराईचा काळ असल्याने एसटी बसेसमध्ये गर्दी असते. याच काळात अनेक महिला प्रवासी सोन्याचे दागिने घालून प्रवास करतात. त्यामुळे चोरट्यांचे फावते. प्रवास करताना मौल्यवान वस्तू आणि दागिने सोबत घेऊ नये, अनोळखी प्रवाशांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### ३ ठिकाणी चोरी केल्याचे तपासात उघड

### चोरीच्या गुन्ह्यात महिलांची साखळी असण्याची शक्यता

लातूर बसस्थानकात अटक करण्यात आलेल्या महिलेकडे ५ लाखांचे दागिने आढळल्याने पोलिसही चक्रावले आहेत. या चोरी प्रकरणात महिलांची टोळी कार्यरत असावी, अशी शक्यता व्यक्त होत आहे. महिलेने यापूर्वी चोरी केलेले दागिने कुणाला विकले याचीही माहिती पोलिस घेत आहेत. त्यामुळे चोरीच्या गुन्ह्यातील साखळी समोर येण्याची शक्यता आहे. तसेच महिलेने आणखी काही ठिकाणी चोरी केली असावी, असा अंदाज आहे. त्यामुळे इतर करण्यासाठी पोलिस महिलेची चौकशी करत गुन्ह्यांतील मुद्देमाल जप्त आहेत. साधी राहणी असल्याने या महिलेचा कुणालाही संशय येत नसे.

### चोरीच्या गुन्ह्यात तेलंगणातील महिलांची चौकशी

लातूर शहरातील दोन बसस्थानकात चोरीच्या घटना वाढत आहेत. दरम्यान, याचा तपास करताना तेलंगणा राज्यातील काही महिला शहरात येऊन चोऱ्या करत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काही महिलांची चौकशी केली जात आहे. या महिलांना मराठी येत नसून त्या तेलगू भाषेत संवाद साधतात. त्यामुळे तपासात अडचणी येत आहेत

# राज्यात कॉपी प्रकरणी ३७ केंद्र दोषी

## नऊ विभागात मिळून ९३ घटनांची नोंद

पुणे, (दिव्य न्युज):- राज्यात एकूण नऊ विभागामध्ये ५१३० केंद्रावर दहावीची परीक्षा पार पडली. त्यातील ३७ केंद्र कॉपी प्रकरणात दोषी आढळली असून, या केंद्रांवर एकूण ९३ घटना घडल्याची नोंद झाली आहे. तसेच सहा एफआयआर दाखल करण्यात आल्याची माहिती राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी मंगळवारी दिली. तसेच दोषी केंद्रांची मान्यता रद्द करण्याची प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, कॉपी प्रकाराला आळा घालण्यासाठी राज्यात २० ते २६ जानेवारी या काळात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले होते. ५ हजार १३० पैकी ७०१ केंद्रांवरील सर्व कर्मचारी बदलण्यात आले होते. तब्बल २७१ भरारी पथके आणि प्रत्येक



केंद्रावर बैठी पथके नेमवत अनुचित प्रकार घडू नये यासाठीची आवश्यक खबरदारी घेण्यात आली होती.

सर्व खबरदारी घेऊनही ३७ केंद्रावर अनुचित प्रकार झाल्याचे निदर्शनास आले. यात विभागनिहाय विचार करता सर्वाधिक छत्रपती संभाजीनगर विभागात १३ केंद्रावर कॉपीच्या ३७ घटना घडल्या. त्या पाठोपाठ नागपूर विभागात ७ केंद्रांवर २२ घटना, पुणे विभागात ७ केंद्रांवर १७ घटना, लातूर विभागात ७ केंद्रांवर १३ घटना आणि मुंबई विभागात ३ केंद्रावर ४ घटना घडल्या आहेत. कोल्हापूर, अमरावती, नाशिक आणि कोकण विभाग निरंक आहे. एफआयआर दाखल झाल्याच्या घटना पाहता नागपूर विभागात २, नाशिक २, छत्रपती संभाजीनगर १ आणि अमरावती येथील १ नोंद दिसून येत आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या निकालानुसार राज्यात सिंधुदुर्ग जिल्ह्याचा निकाल ९९.३२ टक्के लागला असून, या जिल्ह्याने दहावीच्या निकालात राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. सर्वात कमी गडचिरोली जिल्हाचा निकाल ८२.६७ टक्के लागला आहे. यात पुणे जिल्ह्याचा निकाल ९७.२६ टक्के असून, या विभागात पुणे जिल्हा अव्वल स्थानी आहे.

# देशात लवकरच बॉम्बस्फोट होणार?

मुंबई , (दिव्य न्युज):- भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या वाद चालू आहे. पहलगाम हल्ल्यानंतरहा वाद जास्तच वाढलाय. सध्या मात्र दोन्ही देशांत शस्त्रसंधी झाली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशाला संबोधित करत पाकिस्तानला चांगलेच खडसावले आहे. आम्ही दहशतवादी आणि दहशतवादाला पाठिंबा देणारे सरकार यांना वेगळे मानत नाही, असे मोदी यांनी स्पष्ट केले आहे. असे असतानाच आता देशात लवकरच बॉम्बस्फोट होणार असा धमकीचा मेल आहे. या धमकीच्या मेलमुळे देशात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार देशात लवकरच बॉम्ब ब्लास्ट होणार असल्याचा धमकीचा मेल आला आहे. तशी माहिती महाराष्ट्र पोलीस नियंत्रण

### धमकीच्या मेलने खळबळ

कक्षाकडून मुंबई पोलिसांना देण्यात आली आहे. या माहितीनंतर मुंबई पोलीस सतर्क झाले आहेत. सोबतच मुंबई पोलिसांकडून सर्व प्रकारची खबरदारी घेण्यात येत आहे.

आपत्ती व्यवस्थापनाच्या कंट्रोल रुमला हा धमकीचा मेल आला आहे. याच मेलच्या अनुषंगाने सोमवार ते बुधवार या काळात सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. धमकीच्या मेलमुळे सगळीकडे सध्या खळबळ उडाली आहे. सध्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या तणावाची स्थिती आहे. असे असतानाच हा मेल आल्यामुळे सर्व यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. कोणतीही चूक होऊ नये यासाठी खबरदारी घेतली जात आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाद सध्या थोडा शमला आहे. पण मोदी यांनी १२ मे रोजी देशाला संबोधित करत पाकिस्तानला चांगलेच खडसावले आहे. टेटर आणि ट्रेड एकत्र चालू शकत नाही. रक्त आणि पाणी सोबत वाहू शकत नाहीत, असं म्हणत मोदी यांनी आम्ही यापुढे दहशतवादी हल्ले खपवून घेणार नाही, असं थेट सांगून टाकलं आहे.दरम्यान, याआधीही मुंबई शहरासह देशांच्या इतर भागात धमकीचे मेल आलेले आहेत. यावेळीही धमकीचा मेल आला असून त्यााला प्रशासनाने गांभीर्याने घेतलं आहे. हा मेल नेमका कोणी पाठवला? याचा कसून शोध घेतला जात आहे.

पान १ वरून

### विभागात बीड

९५.१९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. यामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदाचा निकाल २.३७ टक्क्यांनी घसरला आहे.

कॉपीमुक्त अभियानाची उत्तम अंमलबजावणी झाल्याने निकाल घसरल्याचे त्यांनी सांगितले. यंदा छत्रपती संभाजीगर जिल्ह्यातील ६६हजार ६२६विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती. यापैकी ६२हजार ३६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्याची उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी ९३.६०टक्के आहे. बीड जिल्ह्यातील ४१हजार५४१विद्यार्थी परिक्षेला बसले होते. यापैकी ४० हजार ९७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

बीड जिल्ह्यातील ९६.४७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. परभणी जिल्ह्यातील २८हजार ५९२ विद्यार्थ्यांनी परिक्षेला उपस्थिती नोंदविली होती. यापैकी २५ हजार५१६विद्यार्थी पास झाले आहेत. परभणीच्या पास विद्यार्थ्यांची टक्केवारी ८९.२४ आहे. जालना जिल्ह्यातील ३१हजार ५८५ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. यापैकी २८हजार ८८३ विद्यार्थी पास झाले. या विद्यार्थ्यांची टक्केवारी ८९.०७टक्के आहे. हिंगोली जिल्ह्यातील १५हजार६१३ विद्यार्थ्यांनी परिक्षेला उपस्थिती नोंदविली होती. यापैकी १३हजार ९०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हिंगोलीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी ८९.८२ टक्के आहे.

मुलांच्या तुलनेत मुलींचे उत्तीर्णतेच प्रमाण ४.८ टक्केनी अधिक

छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत असलेल्या पाच जिल्ह्यांतर्गत १लाख२हजार ७२७ मुले परिक्षेला बसले होते. यापैकी ९३हजार १७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण मुलांची टक्केवारी ९०.७० टक्के आहे. दुसरीकडे ८१हजार२३० मुलींनी परिक्षेला हजेरी नोंदविली होती. यापैकी ७७हजार ५७६ मुलीं उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांच्या तुलनेत मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण ४.८ टक्क्यांनी अधिक असल्याचे बोर्डाचे अध्यक्ष साबळे यांनी सांगितले.

### लग्नाची हळद उतरण्या

असता घरातील लाईट बंद होती. आईने लाईट लावली असता मुलगी दिसली नाही, म्हणून एकच गोंधळ केला. त्यानंतर नातेवाईकांनी मुलीचा शोध घेतला असता ती कुठेच आढळून आली नाही. अखेर नवरीच्या भावाने केज पोलिस स्टेशनमध्ये बहीण हरवल्याची तक्रार केली. प्रियकरासोबत पळून जाताना नवरीने सोन्याचे कानतले, मंगळसूत्र, एटीएम कार्ड, क्रेडिट कार्ड आणि मोबाईलसब पळ काढला आहे.

जालन्यातील जाफराबाद तालुक्यातील खामखेडा येथील अनिल फदाट हे भावासाठी मुलगी पाहत होते. त्यांच्या ओळखीतील एकाने मुलगी आहे असे सांगितले होते. त्यानुसार मुलींकडच्यांनी घरी येऊन मुलाला पसंत केले. मुलगी पाहून देतो म्हणून एजंटाने काही रक्कम द्यावी लागेल, लग्न तुम्हालाच लावावे लागेल, असे सांगितले. मुलाच्या भावाने अट मान्य करून लग्नास होकार दिला. मुलीचे स्थळ पाहून देणाऱ्याला रक्कमही दिली. खामखेडा गावात ९ मे रोजी रात्री उशिरा लग्न लागले. दुसऱ्या दिवशी मुलीला राजूर येथे दर्शनासाठी घेऊन जायचे म्हणून नवरदेव, नवरी आणि तिची बहीण जात होते. राजूर रोडवर नवरीने थोडं थांबा म्हणून गाडी थांबवली. त्याच गाडीजवळ असलेल्या दुसऱ्या गाडीत नवरी आणि तिची बहीण बसून पसार झाल्या.

### गावात मुस्लिम

म्हणणे आहे.मुस्लिम कब्रस्तान वक्फ बोर्डच्या अखत्यारीत असून संबंधित मुद्दा सध्या न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयीन निर्णय न लागता सरळ कबरी समतल केल्या गेल्याने मुस्लिम समाजात असंतोष आहे. कब्रस्तानातल्या जुन्या कबरीवर बुलडोझर चालवला गेला, हे आमच्या धर्मावरील थेट आक्रमण आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली.या पार्श्वभूमीवर कुल हिंद मजलिसे इत्तहादुल मुस्लिमीनचे नेते अन्वर हाश्मी यांनी संताप व्यक्त करत म्हटले, जर हे कुणाच्या सांगण्यावरून, पुण्याहून बसून ठरवले असेल, तर त्यालाही वेळ आली आहे की जनतेनं जागा दाखवावी. आम्ही वक्फ संपत्ती आणि कब्रस्तानाच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरू. एमआयएम शेवटच्या श्वासापर्यंत हा लढा लढेल.

### महाराष्ट्रातील सर्वात

पक्षातील पुरोगामी कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. जितेंद्र आव्हाड, प्रशांत जगतापांसारखी मंडळी वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहेत. तर अनेक कार्यकर्ते यावर लवकर निर्णय घेण्याची मागणी करत आहेत. विकास लवांडे यांनी पवार कुटुंबाने ही संभ्रमावस्था संपवावी असं थेट आवाहनच केले आहे.

दुसरीकडे अंकुश काकडेंसारखी मंडळी मात्र पक्षाची सद्यस्थिती नजरेसमोर ठेऊन अजितदादांसोबत जाण्यासाठी आग्रही दिसत आहेत. यासाठी त्यांनी थेट सुप्रियाताईंनाच पत्र लिहून आपली भूमिका मांडली आहे. त्यातच वाय बी चव्हाण सेंटरमध्ये पवार काका-पुतणे एकाच मंचावर आले. यावेळी शरद पवार आणि अजित पवारांमध्ये चर्चा झाल्याचं पाहायला मिळाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसा यांच्या भाषणादरम्यान दोघांत संवादही झाला. त्यामुळे एकत्रिकरणाच्या चर्चांना बळकटी मिळाली आहे. शरद पवार खरंतर पुरोगामी विचारांचे पाईक मानले जातात. किंबहुना त्यासाठीच ते अजितदादांसोबत सत्तेत गेलेले नाहीत. मात्र, आता पक्षातलाच एक मोठा गट सत्तेसाठी अजितदादांसोबत जाण्यासाठी त्यांच्यावर अनेक प्रकारे दबाव टाकू लागलाय. त्यामुळे शरद पवारांनी याबाबतचा निर्णय थेट सुप्रिया सुळे यांच्या कोर्टात ढकलून दिला आहे. आगामी पक्ष बैठकीत विचारधारा तग धरतेय की सत्ता जिंकतेय हेच पाहायला मिळत.

### बीड न.प.तील

दर जो ठरवून दिलेला आहे. त्याच दराप्रमाणे ही खरेदी प्रक्रिया झालेली आहे. २६ ते ३० वॅट एलईडीचा डीएसआर दर प्रतिनग २ हजार ५७० असून १ हजार ८२० प्रति दर (३५ वॅट) प्रमाणे नगर पालिकेने ते खरेदी केलेली आहेत. ४० ते ५० वॅटचा डीएसआर दर प्रतिनग ४ हजार ११७ असून ते एलईडी २ हजार ४० रूपये प्रतिनग प्रमाणे आणि ७० ते ७५ वॅटची एलईडीचा डीएसआर दर ५ हजार ९४५ असून ती एलईडी २ हजार ८५० प्रतिनग दराप्रमाणे नगर पालिकेने खरेदी केलेली आहे. यावरून एलईडी लाईट खरेदी प्रक्रिया ही अंत्यत पारदर्शीपणाने करण्यात आली आहे.

### नव्या सरन्यायाधीशांच्या

कमलाताई गवई यांनी व्यक्त केलं आहे.दरम्यान लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला मोठं यश मिळालं होतं, महायुतीच्या अनेक दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला, मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीनं जोरदार पुनरागमन केलं, राज्यात महायुतीला पूर्ण बहुमत मिळालं. महायुतीच्या राज्यामध्ये तब्बल २३२ जागा निवडून आल्या तर महाविकास आघाडीला अवघ्या ५० जागांवरच समाधान मानावं लागलं, त्यानंतर सातत्यानं महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे, बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्या पाहिजेत अशी मागणी होत आहे. त्यासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते उत्तम जाणकर यांनी मोठं आंदोलन देखील उभारलं आहे, माहाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांकडून बॅलेट पेपरवर निवडणुकीची मागणी होत आहे.

### वर्षभरात बीड जिल्ह्यात

केअर, बोगस लिंक, लॉन प इतरमाध्यमातून फसवणूक झाली. या प्रकरणात एकूण ९० गुन्हे सायबर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, दिवसेंदिवस सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, या घटनांमुळे पोलिस प्रशासन सतर्क झालं आहे. अशा गुन्ह्यामध्ये सापडणाऱ्या कडक शिक्षा करण्याची मागणी देखील केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सर्रास मोबाईलवरुनच फसवणूक होत असल्याचे दिसत आहे. विविध कारणं सांगून नागरिकांना विशासात घेतलं जातं. त्यानंतर त्यांच्याकडून बँकेच्या खात्यासंदर्भात माहिती घेऊन त्यांची फसवणूक केली जात आहे. याप्रकरणी विविध ठिकाणी गुन्ह्यांची नोंद देखील करण्यात आली आहे. दरम्यान, असा गुन्ह्यात फसवणूक होऊ नये म्हणून नागरिकांनी योग्य ती काळजी घेतली पाहिजे.

### निवडणुकांची तयारी,

रणनीती आखण्यात येत आहे. त्यातच, आता भाजपने राज्यातील सर्वच जिल्ह्यांसाठी भाजपच्या (इगझ) ५८ जिल्हाध्यक्षांची नियुक्ती केली आहे. त्यामध्ये, मुंबई जिल्हाध्यक्षपदासाठी ३ पदे तयारी करण्यात आली आहे. उत्तर मुंबई, उत्तर पूर्व मुंबई आणि उत्तर मध्य मुंबईसाठी जिल्हाध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. त्यामध्ये, अनुक्रमे दीपक तावडे, दीपक दळवी आणि विरेंद्र म्हात्रे यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र भाजपमध्ये संघटनात्मक फेरबदल करण्यात आले असून अखेर भाजपकडून नव्या जिल्हाध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. राज्यातील मंडळ आणि तालुका अध्यक्षांच्या नेमणुकीनंतर भाजपकडून जिलाध्यक्षांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. भाजपचे प्रदेश निवडणूक निर्णय अधिकारी चैनसुख संचेती यांच्या सहीने भाजपकडून परिपत्रक जारी करत नव्या जिल्हाध्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. भाजपने कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि मुंबईत अशा प्रदेशात राज्यातील ३६ जिल्ह्यात एकूण ५८ जिल्हाध्यक्षांची निवड जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात आणि ही नियुक्ती प्रक्रिया पार पडली.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने भाकरी फिरवली असून मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर महापालिकांमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासह राज्यातील बहुतांशी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपला विजय मिळवण्याचा पक्षाचा प्रयत्न असेल. त्याच, पार्श्वभूमीवर या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे गेल्याच आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले आहेत. सन २०२२ च्या राजकीय आरक्षणासह या निवडणुका घेण्यात याव्यात. पुढील ४ महिन्यात निवडणुकांचा कार्यक्रम आखणी करुन निवडणुका घ्याव्यात, असे निर्देशच सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे, या निवडी महत्त्वाच्या मानल्या जातात.